25 वर्षे विकासाची
मिरा भाईंदर महानगरपालिका
"माझे शहर, माझा अभिमान"

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्यालय, २रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र.०२२-२८१९२८२८ ई-मेल आयडी pwd@mbmc.gov.in

**// बांधकाम / विद्युत विभाग //**

जा.नं.मनपा/साबां/वि/2909/२०२६-२७
दि 28/06/२०२६

प्रति,

**जनसंपर्क अधिकारी**

मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :** जाहीर नोटीस प्रसिध्दी बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका वृत्तपत्रात प्रसिध्द करावयाची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २२४ नुसार रस्ते सार्वजनिक घोषित करणेची जाहीर नोटीस सोबत जोडलेली आहे. सदर जाहिर नोटीस दोन दिवसात राज्य**स्तरीय** वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात यावी. जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर सदर वृत्तपत्राचे कात्रण मुख्य कार्यालयातील नोटीस बोर्डावर तसेच सर्व प्रभाग कार्यालयातील नोटीस बोर्डवर लावण्यात यावी ही विनंती.

शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**सोबत** — जाहीर नोटीस

PC-14/2026-27/DK/L-11

25 वर्षे विकासाची

"माझे शहर, माझा अभिमान"

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
**भाईंदर (प.), ता.ठाणे-401101 दुरध्वनी क्रं.28192828**

## बांधकाम / विद्युत विभाग

---

**जा.नं. मनपा/साबां/वि./शा.अ.-1/** २९०९/२०२६-२१० **दि.** २८/०६ **/2026**

## // जाहिर नोटीस //

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) दिपक हॉस्पीटल रस्त्यावरील पर्ल डायमंड इमारतीकडे जाणारा रस्ता हा वहिवाटीचा व वापराचा रस्ता उपलब्ध आहे. सदर रस्ता सार्वजनिक स्वरूपाचा असणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 224 अन्वये कोणताही खाजगी रस्ता आयुक्तांचे समाधान होईल अशा रीतीने समतल केला असेल. त्यावर खडी घालण्यात आली असेल. त्यास चिरेबंदी किंवा फरसबंदी करण्यात आली असेल. त्यात मलजलवाही, नाली किंवा पाट बांधण्यात आलेला असेल व तो चांगला करण्यात आला असेल तेव्ही, आयुक्तास, अशा रस्त्यात दिवे, दिव्यांचे खांब व दिवाबत्तीची सोय करण्यासाठी आवश्यक असलेला अन्य उपकरण संच यांची त्याचे समाधान होईल असा रस्ता सार्वजनिक रस्ता होईल व तो सार्वजनिक स्वरूपाचा रस्ता घोषित करण्याचा अधिकार आहे. त्या अधिकारात सदरचा रस्ता सार्वजनिक रस्ता म्हणून घोषित करावयाचा असून रस्त्याची लांबी 95.00 मी. व रुंदी 7.50 मी. इतकी असून सदर रस्ता मौजे गोडदेव सर्वे क्र.39/15, 37/5, 39/11 व 37/4 या जागेतून जात असून सदर 7/12 वरती मालकी अनुक्रमे श्रीम. हरकुबाई नाना पाटील व इतर, श्रीम. शोभा भास्कर पाटील व इतर, श्रीम. प्रमिला मोहन घरत व इतर, श्री. बाळकृष्ण सोनू शेटे यांची दिसून येत आहे. अधिक माहिती व नकाशाची प्रत बांधकाम/ विद्युत विभागात कार्यालयीन कामाच्या दिवशी व वेळेत उपलब्ध होईल. सदर प्रस्तावाबाबत काही आक्षेप असल्यास सदर लेखी आक्षेप कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम/ विद्युत विभाग) चौथा मजला मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, ता.जि. ठाणे 401101 यांचे कार्यालयात दि. 27 /07/2026 पर्यंत सादर करण्यात यावे. तद्नंतर असलेल्या अक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

**(दिपक खाबित)**
**शहर अभियंता**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

---